# महाराष्ट्र शासन
## संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
## DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
Govt. Dental College & Hospital Building, St. George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel.+91-22-22620361-65/22652257/59 Telegram: "MEDUCATNSEARCH"
Fax: +91-22-22620562/22652168 Website: http://www.dmer.org


क्र.संवैशिवसं/तांत्रिकपदे/जाहिरात/फ/२००६, दिनांक: २३ सप्टेंबर, २००६

# जाहिरात

## सरळसेवेने "तांत्रिक" संवर्गातील (अपंग, सर्वसाधारण व मागास संवर्ग) विविध पदांसाठी नेमणूक - स्पर्धा परीक्षा - २००६
## MEDSS-CWT-2006

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये, आरोग्य पथके आणि नागरी स्वास्थ केंद्र येथील तृतीय श्रेणीतील रिक्त पदे भरण्याकरीता स्पर्धापरीक्षेसाठी अर्हताप्राप्त उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, पदांचा तपशिल, शासनाच्या नियमानुसार संवैधानिक आरक्षण, अपंगांचे आरक्षण, स्पर्धा परीक्षेचा पदनिहाय अभ्यासक्रम आणि अर्जाचा नमुना इत्यादींची सविस्तर माहिती माहितीपुस्तिकामध्ये नमूद केलेली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्रमांक ७०/२००२ मध्ये दिनांक ७/९/२००६ रोजी पारित झालेल्या आदेशानुसार "सर्व अपंगांचा अनुशेष भरला जात नाही तो पर्यंत शासनाला अपंगांचा अनुशेष वगळता इतर कोणत्याही पदावर नियुक्ती देता येणार नाही".

सदर आदेशाप्रमाणे स्पर्धा परीक्षा झाल्यानंतर सर्व प्रथम राज्य गुणवत्ता यादीनुसार अपंगांचे अनुशेष भरण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल. मा. उच्च न्यायालयाचे पुढील आदेश प्राप्त झाल्यानंतर सर्वसाधारण आणि मागास संवर्गातील पदांवरील निवड राज्य गुणवत्ता यादीनुसार केली जाईल.

| | | |
|---|---|---|
| १ | **अर्ज व माहिती पुस्तिका मिळण्याचे ठिकाण** | सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये मुंबई/पुणे/मिरज/कोल्हापूर/सोलापूर/धुळे/अकोला/नांदेड लातूर/औरंगाबाद/यवतमाळ/अंबाजोगाई व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांचे कार्यालय |
| २ | **अर्ज व माहिती पुस्तिका मिळण्याचा दिनांक व अर्ज स्विकारण्याचा दिनांक** | **दिनांक ५/१०/२००६ ते १८/१०/२००६** |
| ३ | **माहिती पुस्तिका / अर्ज व परीक्षा शुल्क** | खुल्या वर्गाच्या उमेदवारांकरिता रु. ४००/- मागासवर्गीय उमेदवारांकरिता रु. ३००/- (यासाठी जातीचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक आहे.) **(प्रत्येक गटासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे)** |

सदरची रक्कम "Director, Medical Education & Research, Mumbai" किंवा "DMER, Mumbai" यांच्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे स्विकारली जाईल. सदरचा डिमांड ड्राफ्ट मुंबई येथे देय असावा.

| | | |
|---|---|---|
| ४ | **प्रवेशपत्र (ॲडमिट कार्ड) मिळण्याचा दिनांक व ठिकाण** | दिनांक १४/११/२००६ पासून, अर्जदाराने ज्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अर्ज सादर केला आहे त्या ठिकाणी. |
| ५ | **लेखी परीक्षेचा दिनांक व वेळ** | **रविवार दिनांक २६/११/२००६ रोजी<br>गट – अ : सकाळी १०.०० ते ११.०० पर्यंत<br>गट – ब : दुपारी २.०० ते ३.०० पर्यंत** |
| ६ | **लेखी परीक्षेचा निकाल** | **अपंग उमेदवारांसाठी दिनांक २/१२/२००६<br>सर्व साधारण उमेदवारांसाठी दिनांक २१/१२/२००६** |
| ७ | **वयोमर्यादा (दिनांक: १/१०/२००६ रोजी)** | **खुला संवर्ग :** किमान १८ वर्षे ते कमाल ३३ वर्षे<br>**मागास संवर्ग :** किमान १८ वर्षे ते कमाल ३८ वर्षे<br>**अपंगांकरीता :** किमान १८ वर्षे ते कमाल ४५ वर्षे |

सदरच्या स्पर्धा परीक्षेतील गट–अ मधील उपलब्ध असलेल्या जागांचा संवर्गनिहाय तक्ता

**गट–अ**

**(किमान पात्रता १० वी किंवा १२ वी उत्तीर्ण व संबंधित पदासाठी लागू असलेली शैक्षणिक अर्हता)**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | जात प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | गृह नि वस्त्रपाल (House & Linen Keeper) | ३ | अजा-१/ अज-१ / अपंग-१ (PD/D) |
| २. | गृहवस्त्र भांडारपाल (House & Linen Storekeeper) | १ | खुला-१ |
| ३. | वस्त्रपाल (Linen Keeper) | ३ | अजा-२ / खुला-१ |
| ४. | सहाय्यक वस्त्रपाल (Asst. Linen Keeper) | १ | खुला-१ |
| ५. | सुतार (Carpenter) | २ | खुला-२ |
| ६. | सहाय्यक सुतार (Assit. Carpenter) | ३ | खुला-२ / अज-१ |
| ७. | विज तंत्री (Electrician) | २ | खुला-२ |
| ८. | प्रलेखाकार (Documentalist) | १ | अजा-१ |
| ९. | ग्रंथालय सहाय्यक (Library Asst.) | २ | खुला-१/ अजा-१ |
| १०. | दंत आरोग्यक (Dental Hygiensit) | ६ | विजा (अ) - १/खुला-२/ भज (क)-१/ इमाव-१ / अजा-१ |
| ११. | दंत तंत्रज्ञ (Dental Technician) | ४ | अजा-१/ अज-२ / खुला-१ |
| १२. | सहाय्यक दंत तंत्रज्ञ (Assistant Dental Technician) | १ | खुला-१ |
| १३. | यांत्रिकी (Mechanic) | १ | खुला-१ |
| १४. | विद्युत जनित्र यंत्रचालक (Electric Generator Operator) | ३ | खुला-२ / अजा-१ |
| १५. | कलाकार (Artist) | २ | खुला-२ |
| १६. | छायाचित्रकार (Photographer) | २ | अज-१ / खुला-१ |
| १७. | छायाचित्र-नि-कलाकार (Photographer-cum-Artist) | ४ | खुला-४ |
| १८. | वरिष्ठ तंत्रज्ञ इलेक्ट्रिकल (Senior Technician Electrical) | १ | खुला-१ |
| १९. | प्रयोगशाळा सहायक (Laboratory Assistant) | ५८ | अजा-४ / अज-७ / विजा (अ) -३/ भज (ब)-२/भज (क)-३/ इमाव-१० / विमाप्र-४/खुला-२१/अपंग-४ (PS/LV/PD/OL) |
| २०. | वातानुकूल सयंत्र चालक (Air conditioned Plant Operator) | १ | खुला-१ |
| २१. | वरिष्ठ तंत्रज्ञ रेफ्रिजरेशन (Sr. Tech Refridgeration) | १ | खुला-१ |
| २२. | शिंपी (Tailor) | ५ | खुला-३/अज-१/इमाव-१ |
| २३. | दुरध्वनी चालक (Telephone Operator) | ८ | अजा-२/अज-२/खुला-२/अपंग-२ (PS/LV) |
| २४. | कातारी नि जोडारी (Turner cum Fitter) | २ | खुला-२ |
| २५. | क्ष-किरण सहाय्यक (X-Ray Assistant) | ५ | खुला-३/अज-१/अजा-१ |
| २६. | अंधारखोली सहाय्यक (Darkroom Assistant) | ६ | खुला-३/अजा-३ |
| २७. | सहाय्यक ग्रंथपाल (Assistant Librarian) | ३ | खुला-२/अजा-१ |
| २८. | नेत्रचिकित्सा सहाय्यक (Ophthalmic Assistant) | १ | खुला-१ |
| २९ | सुरक्षा अधिकारी (Security Officer) | १ | खुला - १ |
| ३० | क्ष-किरण तंत्रज्ञ (X-Ray Technician) | ७ | खुला - २ / अज - ३ / विजा (अ) -२ |
| ३१ | सी. टी. स्कॅन तंत्रज्ञ (C. T. Scan Technician) | ५ | खुला - ५ |

स्पर्धा परीक्षेतील गट–ब मधील उपलब्ध असलेल्या जागांचा संवर्गनिहाय तक्ता

**गट – ब**

**(किमान पात्रता पदवी किंवा पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण संबंधित पदासाठी लागू असलेली शैक्षणिक अर्हता)**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | जात प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Laboratary Technician) | ३४ | खुला-१० / अजा-५ / अज-१०/ विजा (अ) - १ / भज (ब) - १ / भज (क)-१ / इमाव -२ / विमाप्र - १ अपंग-३ (PS/LV/OL) |
| २. | इ.सी.जी. तंत्रज्ञ (E.C.G. Technician) | ५ | खुला - २ / अज -२ / अपंग-१ (PD/D) |
| ३. | डायलेसिस तंत्रज्ञ (Dialysis Technician) | ४ | खुला -१ / अज - १ / अजा - १ / विजा (अ) -१ |
| ४. | संजीवन शास्त्रज्ञ (Perfusionist) | २ | खुला - १ /अजा - १ |
| ५. | आहार तज्ञ (Dietician) | ३ | खुला -२ / अज -१ |
| ६. | व्यवसायोपचारक (Occupational Therapist) | ६ | खुला-५ / अज-१ |
| ७. | भौतिकोपचार तज्ञ (Physiotherapist) | ८ | इमाव - १ / खुला - ६ / अज -१ |
| ८. | भौतिक शास्त्र तंत्रज्ञ (Physicist Technician) | १ | खुला - १ |
| ९. | रेडीओ थेरपी तंत्रज्ञ (Radiotherapy) | ३ | खुला - १ / अजा - १ / अज - १ |
| १०. | ब्रॅकी थेरपी तंत्रज्ञ (Brachitherapy) | १ | खुला - १ |
| ११. | मोल्डरूम तंत्रज्ञ (Mould Room Technician) | १ | अपंग - १ (PS) |
| १२. | मनोरुग्ण सामाजिक कार्यकर्ता (Psychiatric Social Worker) | २ | खुला - १ / अपंग - १ (LV) |
| १३. | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (Medical Social Worker) | १२ | खुला - ४/इमाव-१/अजा-२/अज-२ अपंग - ३ (PD/PS/OL) |
| १४. | महिला अधिक्षिका (Lady Superintendent) | १ | खुला - १ |
| १५. | श्रवणमापक तंत्रज्ञ (Audiometric Technician) | ३ | खुला - ३ |
| १६. | प्रोस्थेटिस्ट तंत्रज्ञ (Prosthetist Tech.) | १ | खुला - १ |
| १७. | शारीरीक शिक्षण निर्देशक (Physical Training Instructor) | २ | खुला - २ |
| १८. | वरिष्ठ औषध निर्माता (Senior Pharmacist) | १ | खुला - १ |
| १९. | औषध निर्माता (Pharmacist) | ८ | अजा - २ / खुला - ३ / इमाव - २ / अपंग - १ (PD) |
| २०. | ऑर्थोटिक तंत्रज्ञ (Orthotic. Technician) | ३ | अज - १ / खुला - २ |

OL-One leg affected / LV - Low vision / D - Total deaf / PD - Partially deaf / PS - Partially sighted

उपरोक्त तक्त्यातील पदांकरिता अर्ज करण्यापूर्वी सदर पदांसाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हतेच्या पात्रतेबाबत संचालनालयाच्या संकेतस्थळावरून / वेबसाईटवरून **(www.dmer.org)** खात्री करून त्यानंतरच अर्ज विकत घेण्यात यावा. तसेच सदरची माहिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सुद्धा उमेदवारांसाठी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

## उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना

१. या जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे. प्रवर्गनिहाय आरक्षणात / प्रवर्गात बदल होण्याची शक्यता आहे.

२. जे कर्मचारी या संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थांमध्ये न्यायालयीन आदेशान्वये तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत आहेत, अशा कर्मचाऱ्यांनी या परीक्षेस बसणे बंधनकारक आहे. त्यांचे वय न्यायालयीन आदेशान्वये शिथिलक्षम राहील.

३. निवड झालेला उमेदवार संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थेत नियुक्ती अथवा बदलीस पात्र राहील.

४. अर्ज, माहिती पुस्तिका व स्पर्धा परीक्षेसाठीचे शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

५. माहिती पुस्तिकेसोबत प्राप्त झालेल्या अर्जामध्येच सर्व माहिती भरून, अर्ज उमेदवाराने विहीत कालावधीत पुन्हा सादर करणे आवश्यक राहील.

६. उमेदवारांना स्वखर्चाने लेखी परीक्षेसाठी हजर व्हावे लागेल.

७. शारीरीक दृष्ट्या अपंग व्यक्तींसाठी राखीव पदांवरील नियुक्तीसाठी संबंधित प्रवर्गाचे किमान ४० टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. अपंग उमेदवारांना संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी गठीत केलेल्या विशेष वैद्यकीय मंडळापुढे अपंगत्वाचे प्रमाण निश्चित करण्यासाठी दिनांक १/१२/२००६ (गट-अ) व २/१२/२००६ (गट-ब) रोजी सकाळी १०.०० वाजता "सीईटी सेल" शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयासमोर, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, छत्रपती शिवाजी टर्मिनल्सच्या बाजूला, मुंबई – ४०० ००१ येथे सर्व मूळ प्रमाणपत्रांसह प्रत्यक्ष हजर राहणे बंधनकारक राहील. विशेष वैद्यकीय मंडळापुढे हजर राहण्याचा दिनांक अपंग उमेदवारांस स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही.

८. उमेदवाराने अर्ज संपूर्णपणे भरणे आवश्यक आहे. अपूर्ण अर्ज कोणतीही सूचना अर्जदारास न देता अमान्य करण्यात येतील. अर्जासोबत कोणतेही प्रमाणपत्र जोडू नये. परंतु अर्जदाराने हव्या असलेल्या संवर्गाची मागणी अर्जामध्ये करणे गरजेचे आहे. अर्ज सादर केल्यानंतर अर्जातील माहिती बदलासाठी कोणतेही निवेदन अथवा शिफारशी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

९. या परीक्षेसाठी/नियुक्तीसाठी महाराष्ट्र राज्यातील शासन मान्य संस्थेतूनच संबंधित अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना पात्र समजण्यात येईल. तसेच महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या उमेदवारांचाच विचार केला जाईल. सदर रहिवासी प्रमाणपत्रात संबंधित उमेदवारांच्या नावाचा उल्लेख आवश्यक राहील.

१०. पोस्टाद्वारे सदरचे अर्ज पाठवले जाणार नाहीत किंवा पोस्टाद्वारे प्राप्त होणारे अर्ज हे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सही/-

ठिकाण : मुंबई **(डॉ. डब्ल्यू. बी. तायडे)**

दिनांक : २३ सप्टेंबर, २००६ **सक्षम प्राधिकारी व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**